‘‘स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव्य विद्याशाखेत पीएच.डी. (अर्थशास्त्र) पदवीसाठी सादर करण्यात येणारा शोधप्रबंधाचा आराखडा’’

–: संशोधनाचा विषय :–

नांदेड जिल्ह्यातील औद्योगिक विकासाचा आढावा : एक चिकित्सक अध्ययन
(कालावधी – २०१० ते २०२०)

–: संशोधक :–

पाटील स्वप्नील माधवराव

एम.ए. बी. एड. अर्थशास्त्र (सेट)

–: मार्गदर्शक :–

डॉ. एस. एम. मुंडकर

एम.ए. एम. फिल पीएच. डी.

सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख

संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट, ता. जळकोट, जि. लातूर

–: संशोधन केंद्र :–

सामाजिक शास्त्रे संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

पिन कोड – ४३१६०६

नांदेड जिल्ह्यातील औद्योगिक विकासाचा आढावा : एक चिकित्सक अध्ययन

(कालावधी – २००१ ते २०२०)

अनुक्रमणिका

१.१ प्रस्तावना

१.२ संशोधन विषयाचे महत्त्व

१.३ संशोधन विषयाची निवड

१.४ संशोधन विषयाची उद्दिष्टे

१.५ संशोधन विषयाचे गृहितके

१.६ संशोधन पद्धती

१.७ संशोधन विषयाची समस्या

१.८ संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा

१.९ संशोधन विषयांच्या प्रकरणांची रूपरेषा

१.१० संदर्भग्रंथ व सूची

प्रस्तावना

मराठवाडा हैद्राबादच्या निजाम राजवटीपासून स्वतंत्र होऊन ७२ वर्षे पूर्ण झाली. मागे वळून पाहताना मराठवाड्याचे मागासलेपण सहज दिसून येते. ब्रिटिशांच्या वर्चस्वाखालील प्रदेशात ज्याप्रमाणे आधुनिकतेची मुख्य संचार साधने दळणवळणाचे मार्ग औद्योगिकीकरण आणि शिक्षणाचे वारे होते ते मराठवाड्यात खूप उशिरा पोहोचले. इतर सुविधांचीही वाणवा होती. शेतीपुरक धोरणांचा औद्योगिक विकासाचा मागमूसही नव्हता. मराठवाड्यात जमिन सुधारणा, हरितक्रांती, शेती विकास, पीक पद्धतीतील नियोजन, पाणीसाठे निर्मिती, नैसर्गिक साधनसंपत्ती, औद्योगिक विकास या सर्व गोष्टीचा अभाव आहे. याशिवाय सर्वात महत्त्वाचे म्हणजे पाणी टंचाईमुक्त करणे, मजूरांचे रोजगाराच्या अभावी होणारे स्थलांतर रोखणे आणि उद्योगांचे केंद्रीकरण न होऊ देता समतोल औद्योगिक विकास घडवून आणणे हे प्रश्न गेल्या ७२ वर्षांत पूर्णपणे सोडवता आलेले नाहीत. मराठवाड्यात ७० च्या दशकातील विकास आंदोलनानंतर औद्योगिक व शैक्षणिक विकासास गती आली मात्र ती औरंगाबाद, जालना या शहरापुरतीच मर्यादित राहिली. तुलनेत इतर जिल्ह्यात फारच उशिरा प्रसार झाला. मराठवाड्यात सर्वात महत्त्वाचा प्रश्न तो औद्योगिक विकास व दुष्काळ मुक्तीचा हे दोन्ही प्रश्न सोडविण्यात आतापर्यंत अपयश आले आहे. मराठवाड्याच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्रात औद्योगिक विकास जास्त का तर त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी, राजकीय इच्छाशक्ती, त्याला लोकांची साथ व सोबत नैसर्गिक संसाधनांची उपलब्धता व मोठ–मोठी विकसित झालेली शहरे, यामुळे पश्चिम महाराष्ट्रात विकासाचा वेग अधिक दिसून येतो. मराठवाड्यात शहरीकरणाचे प्रमाण कमी आहे. औरंगाबादमध्ये सर्वाधिक तर परभणी जिल्ह्यात सर्वात कमी आहे. शिवाय औद्योगिक विकास अल्प झालेला आहे.

एकूण महाराष्ट्रातील औद्योगिक प्रकल्पापैकी केवळ ९.१४ टक्के प्रकल्प मराठवाड्यात आहेत. तेही औरंगाबाद या शहराभोवती केंद्रीत आहेत आणि थोडेफार

जालना व नांदेड या शहरात आहेत. पश्चिम महाराष्ट्रात ज्याप्रमाणे तालुक्यापर्यंत उद्योगाचे जाळे विणले गेले. त्याप्रमाणे मराठवाड्यात दिसून येत नाही. मराठवाड्यातही प्रत्येक जिल्ह्यात एम.आय.डी.सी. (MIDC) स्थापन केल्या आहेत पण औरंगाबाद शहराभोवतालचा अपवाद वगळता इतर जिल्ह्यात एम.आय.डी.सी.तील निम्म्यापेक्षा जास्त उद्योग बंद पडलेले आहेत. याचे कारण म्हणजे उद्योगासाठी पोषक वातावरण निर्मिती करण्यात आलेली नाही. शेती क्षेत्रात निर्माण झालेले पेचप्रसंग आणि रोजगाराच्या अपुऱ्या संधी या कारणाने मराठवाड्यातून दुष्काळात मजूरांचे पुणे, मुंबई, औरंगाबाद व हैद्राबाद या मोठ्या शहरात स्थलांतर जास्त होते. नोकरी, खाजगी क्षेत्रात मजुरी, रोजंदारी, बिगारी काम, मदतनीस, छोटे–छोटे व्यवसाय, हातावरील कलाकुसरीची कामे आदी अशा असंघटीत क्षेत्रात हे मजुरी करत असल्याचे दिसून येते. मराठवाड्यातील विकासाचा प्रश्न सोडविण्यासाठी मराठवाडा वैधानिक विकास महामंडळ स्थापन झाले. याला आर्थिक निधी तरतूदी अभावी प्रभावीपणे विकासाचा प्रश्न सोडविता आला नाही. केवळ बैठका, मागासलेपणाचा आढावा, प्रशासकीय नेमणुका आणि कामकाज या भुमिकेतून प्रत्यक्ष व्यवहारिक पातळीवर हे मंडळ आले नाही. त्यामुळे हे मंडळ आता विकासासाठी एक स्वप्नाळू संस्था म्हणून मराठवाड्यात कार्यरत आहे.

औद्योगिक विकास झालेला नसल्याने मराठवाड्याची अर्थव्यवस्था ही शेतीवर अवलंबून आहे. ७० टक्के कुटूंबे हे शेती आणि शेती संबंधित उद्योग मजुरीवर आपल्या मुलभूत गरजा पूर्ण करतात. शेतमजूर, अल्पभुधारक भूमिहीन यांचे प्रमाण देखील मोठे आहे. तरी शेतीपुरक जोड–व्यवसाय, शेतीमाल प्रक्रिया उद्योग आदीचा विकास करण्यात आलेला नाही. उदा. मराठवाड्यात दुग्धव्यवसाय विकासाचा पूर्णपणे अभाव आहे. दुसरे असे की, जिल्हा ठिकाणच्या कृषी उत्पन्न बाजार समित्या पूर्ण कार्यक्षम बनविल्या नाहीत. या समित्याकडे सातत्याने दुय्यम स्वरूपात पाहण्यात आले. त्यामुळे कृषीमाल कोठे विकायचा हा प्रश्न प्रत्येक जिल्ह्यातील शेतकऱ्यापुढे असतो. तसेच पश्चिम महाराष्ट्रातील

सहकार क्षेत्राचे अनुकरण करत साखर कारखाने काढले गेले. पण दुष्काळ स्थिती, अयोग्य कारभार, भ्रष्टाचार, कमी भाव या कारणाने ते बंद ठेवण्याची वेळ कारखान्यावर आली. सद्यस्थितीत मराठवाड्यातील एकही साखर कारखाना सुरळीत आणि नफ्यात चालत नाही. प्रामुख्याने शेती विकासासाठी व्यावहारिक पातळीवर नवनवीन प्रयोग करायला हवे होते. तसेच शेतीला जोड व्यवसाय असणारे विकास करणे, गरजेचे होते. शेतीमालावर प्रक्रिया आणि दुय्यम प्रक्रिया क्षेत्र उभे करून शेती केंद्रीत उद्योग व्यवसाय उभे करणे आवश्यक आहे. उदा. तेल उत्पादन, सुतगिरण्या, सोयाबिन बियाणे निर्मिती उद्योग, उसाच्या मळीपासून वस्तू बनणारे उद्योग इ. चा ग्रामीण भागात तालुकापातळीवर विकसित करणे गरजेचे आहे. प्रस्तुत संशोधन विषयात नांदेड जिल्ह्यातील औद्योगिक विकासाचा आढावा घेऊन जिल्ह्यात औद्योगिक विकासातील असमतोल कितपत आहे याचा शोध घेऊन, न्याय औद्योगिकरणासाठी व्यवहार्य उपाय योजनांचा अभ्यास करुन त्या सुचविणे हा उद्देश आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :–

दुष्काळप्रवण मराठवाड्यात सत्तरच्या दशकात औरंगाबाद, जालना या दोन सिस्टर सिटीमध्ये औद्योगिकरणाचे वारे वाहू लागते. नव्वदच्या दशकात त्यात भर पडून ऑटोमोबाईल, फार्मा, सीड, स्टील, लिकर, इलेक्ट्रॉनिक्स, आदी विविध क्षेत्रात घोड–दौड सुरू झाली. वेगवेगळ्या नावाने इंडस्ट्रीयल हब म्हणून ओळखले जावू लागले ही घोडदौड अजूनही सुरूच आहे. मात्र औद्योगिक विकास मराठवाड्याच्या केवळ दोनच जिल्ह्यापुरता मर्यादित राहिलेला दिसून येतो त्यामुळे हा विकास संपूर्ण विभागात तालुकापातळीपर्यंत झिरपायला हवा.

महाराष्ट्रातील एकूण उद्योग क्षेत्राचा विचार करता मराठवाड्यात १५.२ टक्के उद्योग आहेत. त्यातून एकूण फक्त ५.३ टक्के गुंतवणूक तर ६.२ टक्के रोजगार निर्मिती

झालेली आहे. राज्याचा विचार करता मराठवाड्यातील सेझमधील गुंतवणूक तर ४.४ टक्के इतकीच आहे. सूक्ष्म, लघू, मध्यम (MSME) उद्योगाचे प्रमाण हे राज्यांच्या तुलनेत ७ टक्के असून त्यातून ६.३ टक्के रोजगार निर्मिती झालेली आहे. उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्याचा मानव विकास निर्देशांक १० टक्क्यांनी, तर दरडोई उत्पन्न तब्बल ३९ टक्क्यांनी मागे आहे. लोकसंख्येच्या तुलनेत विचार केल्यास मराठवाड्यात सुक्ष्म, लघु, मध्यम उद्योगाचे प्रमाण उणे (–१०%), रेजगार निर्मिती (–१०.७%), एम.आय.डी.सी. उद्योग युनिट (–१.८%), याचाच अर्थ मराठवाड्यात अद्यापही औद्योगीकरण झालेले नाही येथे आपणास फार मोठा वाव आहे. त्यामुळे भविष्यातील संधी समजून आता मराठवाड्याने एकजुटीने प्रयत्न केले पाहिजे. यामुळे यावर अभ्यास होणे महत्त्वपूर्ण वाटते. जेणेकरून ह्या उणिवा भरण्यावर व त्यावर प्रकाश पडण्यास मदत होईल.

- ❋ या वरील औद्योगिक विषमतेच्या परिणामांची जाणीव होईल.
- ❋ औद्योगिकरणामुळे संबंधित प्रदेशाचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकास कसा होतो हे समजते.
- ❋ नांदेड जिल्ह्याच्या तालुकानिहाय औद्योगिक मागालेपणाची कारणे व त्यावरील उपायांचे आकलन होईल.
- ❋ अल्पविकसित प्रदेशांच्या विकासात राहिलेल्या त्रुटी, अडचणी, समस्या व त्यावरील उपाय समजण्यासाठी संशोधन प्रकल्प उपयुक्त सिद्ध होईल.

संशोधन विषयाची निवड :–

सध्या आधुनिक महाराष्ट्रात उद्योगाची भुमिका वाढत आहे. राज्यातील लोकसंख्येचा कल प्राथमिक क्षेत्राकडून द्वितीयक व तृतीयक क्षेत्राकडे वाढताना दिसतो. औद्योगिक असमतोलामुळे विकसित व अविकसित प्रदेशामध्ये आर्थिक, सामाजिक,

विकासाबाबत देखील तफावत निर्माण होते. ज्या भागामध्ये औद्योगिक विकास झालेला आहे. त्या अनुषंगाने तेथे इतरही सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास झालेला दिसून येतो. उदा. नांदेड जिल्ह्यातील नांदेड, भोकर, अर्धापूर, मुदखेड व नायगांव या तालुक्यामध्ये औद्योगिक विकास वाढीचे अनेक फायदे या भागांना मिळतात. उदा. उद्योगामुळे रोजगार निर्मिती वाढते. त्यामुळे अनेक प्रशिक्षित, शिक्षित, अशिक्षित कामगार या प्रदेशाकडे आकर्षित झालेल्या आहेत. लोकवस्ती वाढल्याने तेथे शैक्षणिक सुविधा, वाहतुक सुविधा, वैद्यकीय सुविधा, हॉटेलिंग व्यवसाय या अनेक पूरक व्यवसायांचा विकास होताना दिसून येतो.

याउलट दुसरीकडे किनवट, देगलूर, मुखेड, बिलोली, हिमायतनगर, कंधार या तालुक्यांच्या तुलनेने कमी औद्योगिक विकास झालेला आढळतो. त्यामुळे तेथे शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, विकास फारसा झालेला नाही. एकंदरीत हे प्रदेश सर्वांगिण विकासाच्या बाबतीत मागासलेले आहेत.

वरील सर्व परिणामांचा औद्योगिक असमतोल कमी करण्याकरिता प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील तालुक्यांचा तुलनात्मक अभ्यास करुन अविकसित भागांच्या मागासलेपणांची कारणे जाणून त्यावर उपाययोजना सुचविणे. हा या संशोधन विषय निवड मागील प्रयत्न आहे.

संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये :-

१) महाराष्ट्रातील आणि मराठवाड्यातील औद्योगिक विकासाचा थोडक्यात आढावा घेणे.

२) नांदेड जिल्ह्याच्या औद्योगिकरणाचा मराठ वाड्यातील इतर जिल्ह्यांशी तुलनात्मक अभ्यास करणे.

३) नांदेड जिल्ह्यातील नवनवीन उद्योगाची सद्य स्थितीचा आढाव घेणे.

४)	औद्योगिकरणाला चालना देणाऱ्या शासनाच्या योजनांचा आढावा करणे.

५)	नांदेड जिल्ह्यातील उद्योजकांना जाणवणाऱ्या प्रशासकिय, आर्थिक आणि दळणवळणासंबंधी समस्यांवर प्रकाश टाकणे.

६)	नांदेड जिल्ह्यातील औद्योगिकरणाचा रोजगारावरील परिणाम अभ्यासणे.

संशोधन विषयाची गृहितके :

१)	नांदेड जिल्हा औद्योगिक विकासाच्या दृष्टिकोनातून मागास आहे.

२)	मराठवाड्याचे औद्योगिकरण औरंगाबाद व जालना या दोन जिल्ह्यांपुरते मर्यादित राहिलेले आहे.

३)	नांदेड जिल्ह्यातील औद्योगिकरण आणि दुष्काळ स्थिती यांचा सहसंबंध आहे.

४)	राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे नांदेड जिल्हा औद्योगिक दृष्ट्या आजही मागासलेला आहे.

संशोधन पद्धती :

सदरील संशोधन हे प्राथमिक व दुय्यम माहिती स्त्रोतावर आधारित आहे. तसेच संशोधनाच्या वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा प्रस्तुत संशोधनासाठी वापर करण्यात येईल. प्रस्तुत संशोधनात प्राप्त तथ्यांच्या आधारे सखोल अध्ययन करणार आहे. या अभ्यास विषयात माहिती संकलित करून त्या माहितीच्या तथ्यांच्या आधारे विश्लेषण करणार आहे. त्यासाठी पुढील तथ्य संकलित केले जातील.

प्राथमिक तथ्य :

संशोधनासाठी नांदेड जिल्ह्याच्या विविध तालुक्यातील निवडक उद्योग एककांची व ५० स्थानिक नागरिक व ५० स्थानिक उद्योजकांची नमुना म्हणून निवड केली जाईल व

त्यांच्याकडून प्रश्न सूची, प्रत्यक्ष मुलाखत व निरिक्षण साधनाद्वारे माहिती मिळविली जाईल.

दुय्यम तथ्य :

जिल्हा उद्योग केंद्र नांदेडचे वार्षिक प्रशासकीय अहवाल, ॲक्शन प्लॅन, इंडस्ट्रीज रिपोर्ट, सांख्यिकी आकडे इत्यादी तथ्य गोळा केले जातील व तसेच राज्याचा व देशाचा आर्थिक पाहणी अहवाल व अर्थसंकल्प, राज्याचे स्टॅस्टेस्टीक्स हँड बुक, जिल्हा प्रशासनाचे औद्योगिक आकडेवारी, जिल्ह्याचा आराखडा, अग्रणी बँकेची पाहणी अहवाल इत्यादीद्वारे माहिती गोळा करून त्यांचे विश्लेषण करणार आहे.

याचबरोबर औद्योगिकरणासंबंधित असलेले ग्रंथ, संशोधनपर अहवाल, नियतकालिके, उद्योगवार्ता या साहित्यातूनही आवश्यक ती माहिती घेणार आहे.

संशोधन विषयाच्या समस्या :

प्रामुख्याने मराठवाडा विभाग पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मागासक्षेत्र म्हणून ओळखले जाते. विशेषतः १९९० नंतर औद्योगिक विकासाचा आलेख जरी थोड्या प्रमाणात वाढला असला तरी उद्योग क्षेत्र समान पातळीवर पसरलेले दिसत नाही. बहुतांश ठिकाणी उद्योगाचे केंद्रीकरण झाल्याचे दिसते. त्यामुळेच विकासाच्या बाबतही असमानता दिसून येते. मराठवाडा विभागाच्या प्रत्येक जिल्ह्यात समान पातळीवर औद्योगिक क्षेत्राचा विस्तार दिसून येत नाही. विभागातील औरंगाबाद व जालना हे दोन जिल्हे वगळले व काही प्रमाणात नांदेड जिल्हा तर इतर बाकी जिल्ह्यात फार अल्प प्रमाणात विकास दिसून येतो. याभागात अल्पविकासास बरेच घटक कारणीभूत ठरताना दिसून येतात. उदा. उद्योगाच्या वाढीस पोषक वातावरण नसणे, कुशल मनुष्यबळाचा अभाव, पायाभूत सुविधांची कमतरता, मोठ्या बाजारपेठा जवळ नसणे, दळणवळणाच्या सुविधेची कमतरता, सतत पडणारा दुष्काळ, पाण्याच्या पुरेश्या सोयी–सुविधा नसणे आणि मुख्य

म्हणजे जनमाणसात उद्योगाविषयी नसलेले आकर्षण. त्यामुळे प्रस्तुत संशोधनात बऱ्याचशा समस्यांचा आढावा घेत त्यावर उपाय शोधत संशोधनाचा अभ्यास केला जाईल.

संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :

संशोधन विषयाचा विचार करता संशोधनाची व्याप्ती ही महाराष्ट्राच्या औद्योगिकरणाची थोडक्यात स्थिती जाणून घेऊन मराठवाड्यातील उद्योगांची काय सद्यस्थिती आहे. तसेच मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्याच्या औद्योगिकरणाचा आढावा घेण्यासंदर्भात राहिल. जिल्ह्याचा एकूण संपूर्ण आढावा, जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याची वर्गवारी यांच्यातील उद्योगाची स्थिती तेथील विकासाची स्थिती व जिल्ह्याची रोजगारक्षम पातळी पाहणे, जिल्ह्याचे राज्यातील स्थान प्रत्येक घटकाबद्दल जिल्ह्याचा क्रम आणि एकूणच औद्योगिकरणा संबंधित जिल्ह्यातील संपूर्ण आकडेवारी गोळा करून त्याचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे ही राहील. सोबतच मराठवाडा विभागातील उद्योगांच्या बाबतीत मागासलेपण पाहणे अशी व्याप्ती राहील.

प्रस्तुत संशोधनाच्या भौगोलिक क्षेत्राचा विचार करता संशोधन अभ्यासासाठी नांदेड जिल्हा निवडला असल्याने अभ्यासात जिल्ह्यावर भर राहील. तसेच संशोधनाचा कालावधी मर्यादित असल्यामुळे प्रस्तावित अभ्यासाची व्याप्ती ही केवळ नांदेड जिल्ह्यापुरतीच मर्यादित ठेवली आहे. प्रस्तावित अभ्यासाची व्यापकता ही केवळ नांदेड जिल्ह्यापुरतीच असल्यामुळे अभ्यासाच्या माध्यमातून जे निष्कर्ष समोर येतील ते महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांना लागू होतील असे नाही.

कालावधी :

प्रस्तुत संशोधनाच्या कालावधीचा विचार करता राज्याच्या आजपर्यंतच्या आकडेवारीचा आधार घेऊन मुख्यत: भर २०१० ते २०२० या वर्षांत औद्योगिक वाढीच्या

आकडेवारीचा विचार करुन शासकीय स्तरातून प्राप्त झालेल्या आकडेवारीचा आधार या अभ्यास विषयात घेतला जाईल.

संशोधन विषयाच्या प्रकरणांची रूपरेषा :

प्रकरण १ ले – प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणात विषयानुसार प्रस्तावना, विकासाच्या संकल्पना तसेच महाराष्ट्रातील व मराठवाड्यातील औद्योगिक विकासाचा थोडक्यात आढावा या बाबींवर प्रकाश टाकण्यात येईल.

प्रकरण २ रे – संशोधन पद्धती :

प्रस्तुत प्रकरणात संशोधकाद्वारे प्रस्तुत अभ्यासाची संशोधन पद्धती विशद करणार आहेत. यामध्ये संशोधनाचे उद्दीष्ट्ये, गृहितके, व्याप्ती व मर्यादा या संबंधीतील माहिती देणार आहेत. तसेच या प्रकरणाद्वारे प्रस्तुत अभ्यासाचे महत्त्व संशोधकाच्या दृष्टीने काय आहे? या बाबतची चर्चा करणार आहे.

प्रकरण ३ रे – संदर्भ साहित्याचा आढावा :

प्रस्तुत प्रकरणाद्वारे संशोधकाने अभ्यासासाठी निवडलेल्या विषयाच्या संदर्भात यापूर्वी विविध माध्यमातून प्रसिद्ध झालेल्या साहित्याचा थोडक्यात आढावा घेणार आहे.

प्रकरण ४ थे – मराठवाड्यातील औद्योगिक विकासाचा तुलनात्मक अभ्यास :

प्रस्तुत प्रकरणात संशोधकाने अभ्यासासाठी निवडलेल्या मराठवाड्यातील इतर जिल्ह्यापैकी औरंगाबाद व जालना या जिल्ह्यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण ५ वे – नांदेड जिल्ह्याचा तालुकानिहाय औद्योगिकविकासाचा आढावा :

प्रस्तुत प्रकरणात नांदेड जिल्ह्यातील विकसित व अविकसित अशा दोन्ही तालुक्यांचा प्रगतीचा आढाव घेण्यात येईल व त्यांच्या विकसित व अविकसितपणाची कारणीमिमांसा करण्यात येईल.

प्रकरण ६ वे – प्राथमिक माहितीचे विश्लेषण आणि तक्तिकरण :

सदरील प्रकरणाच्या माध्यमातून संशोधकाने संकलित केलेल्या प्राथमिक माहितीचे विश्लेषण या प्रकरणाच्या माध्यमातून करणार आहे.

प्रकरण ७ वे – सारांश, निष्कर्ष व शिफारशी :

प्रस्तुत प्रकरणात वरील प्रकरणाच्या सखोल अभ्यासानंतर व जनतेच्या आणि उद्योजकांच्या आलेल्या मतांचा अभ्यास करुन सारांश निष्कर्ष मांडले जातील.

संदर्भग्रंथ सूची :-

१)	निर्मलदेसाई–भालेराव	– भारतातील औद्योगीक अर्थव्यवस्था, निरली प्रकाशन, पुणे.
२)	राजेंद्ररसाळ	– भारतीय अर्थव्यवस्था, सक्सेसपब्लिकेशन
३)	अलका झिमरे	– भारतीय अर्थव्यवस्था
४)	आर. एस. साळुंके	– महाराष्ट्राची अर्थव्यवस्था

५) नांदेड जिल्हा गॅझेट

६) खादी व ग्राम उद्योग मंडळ अहवाल

७) जिल्हा सर्वेक्षण अहवाल, नांदेड

८) आर्थिक पाहणी अहवाल, महाराष्ट्र राज्य

संकेतस्थळ / वेबसाइट:-

www.midc.gov.in

www.maharashtra.gov.in

www.industry.maharashtra.gov.in

संशोधक

पाटील स्वप्नील माधवराव

एम.ए. बी.एड. अर्थशास्त्र (सेट)

मार्गदर्शक

डॉ. एस. एम. मुंडकर

एम.ए. एम.फिल. पीएच. डी.

सहयोगी प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग प्रमुख

संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट,

ता. जळकोट, जि. लातूर